




सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २८३ • शनिवार दि.८ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.


## नांदेडमध्ये पुन्हा गँगवार ;दुध डेअरीजवळ युवकाचा निर्घृणपणे खून



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरात पुन्हा गँगवारची घटना घडली असून सिडको भागातील दुध डेअरीजवळ आज (शनिवार) दुपारी एका युवकाचा निर्घृणपणे खून केल्याची खळबळजनक घटना घडली आहे.

नांदेड शहरात गुन्हेगारांच्या गँगने डोकेवर काढले असून काही गुन्हेगार जामीनावर नुकतेच सुटले आहेत. शनिवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास शासकीय दुधडेअरीजवळ इंदरसिंघ बलजितसिंघ बावरी (वय २८) रा.कौठा,नांदेड या युवकाला पाच ते सहा जणांनी गाठून अचानक त्याच्यावर तीक्ष्ण हत्याराने हल्ला केला. या हल्ल्यात इंदरसिंघ बलजितसिंघ बावरी याचा जागीच मृत्यू झाला असून घटनेनंतर आरोपी फरार झाले आहेत. घटनेची माहिती समजताच पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, इतवारा पोलीस उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे, नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन तसेच स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन प्रेत शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविले आहे. सदरील खुनाची घटना गँगवारमधून घडल्याचा पोलीसांचा प्राथमिक अंदाज असून तपास वेगाने सुरु केला आहे. काही दिवसांपूर्वी गुन्हेगाराच्या एका टोळीतील काही जण तुरुंगातून जामीनावर सुटले आहेत. इंदरसिंघ बलजितसिंघ बावरी या युवकाची हत्या करण्याचे कारण आरोपींच्या अटकेनंतरच निष्पन्न होईल. दरम्यान जोपर्यंत आरोपींना अटक करणार नाही तोपर्यंत मयताचे पार्थिवदेह ताब्यात घेणार नाही अशी भूमीका मयताच्या नातेवाईकांनी शासकीय रुग्णालयात घेतली होती.

## दिल्लीतील बैठकीनंतर शिंदे-शहा भेट; सह्याद्रीवर राजकीय घडामोडींना वेग

मुंबई/प्रतिनिधी-दिल्लीतील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत जवळपास तासभर झालेल्या बंद दरवाज्यातील चर्चेनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची सह्याद्री अतिथीगृहावर जाऊन भेट घेतली. या सलग बैठकींमुळे राज्यातील राजकीय हालचालींना पुन्हा वेग आल्याचे चित्र आहे.

शुक्रवारी दिल्लीत पंतप्रधान मोदी आणि शिंदे यांच्यात विविध राजकीय व प्रशासकीय विषयांवर सविस्तर चर्चा झाली होती. यावेळी मोदी यांनी शिंदे यांच्या नातवाचीही विचारपूस केल्याने दोघांमधील स्नेह आणि जिव्हाळा चर्चेचा विषय ठरला. याच दौऱ्यात उद्धव ठाकरे गटातून शिंदे गटात आलेल्या सहा खासदारांसोबतही पंतप्रधानांनी चहापान करत संवाद साधला होता.दिल्ली भेटीनंतर लगेचच आज सकाळी शिंदे सह्याद्री अतिथीगृहावर पोहोचले असून तेथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत त्यांची महत्त्वाची बैठक सुरू असल्याची माहिती आहे. या बैठकीत राज्यातील सध्याची राजकीय परिस्थिती, आगामी निवडणुका आणि संघटनात्मक बाबींवर चर्चा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील सह्याद्री अतिथीगृहात दाखल झाले असून, राज्यातील सत्ताधारी नेत्यांमधील समन्वय बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर असून, त्यांच्या हस्ते आज एन.यू. सी.एफ.डी.सी. च्या नव्या कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे. त्यानंतर ते बीएसई इंटरनॅशनल कन्व्हेन्शनमध्ये सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमांना सहकार विभागातील वरिष्ठ अधिकारी आणि सहकारी बँकांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.




नांदेड दक्षिण मतदारसंघातील विजेच्या वाढत्या समस्यांसंदर्भात आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांनी महावितरण कार्यालयाला भेट देवून आढावा बैठक घेतली. यावेळी त्यांनी शेतकरी व नागरिकांना सुरळीत विद्युत पुरवठा करण्या संदर्भात उपस्थित अधिकाऱ्यांना सुचना दिल्या.या बैठकीला महावितरणचे अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

## बदल स्वीकारणाऱ्यांचाच विजय होतो-पंतप्रधान नरेंद्र मोदी



नवी दिल्ली: देशात आणि समाजात होणारे बदल, परिवर्तन जो स्वीकारतो त्याचाच विजय होतो. जो शिकेल तोच जिंकेल, असा स्पष्ट संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील आयआयटी दीक्षांत समारंभात बोलतांना विद्यार्थ्यांना दिला.

दिल्ली आयआयटीच्या दीक्षांत समारंभात विद्यार्थ्यांना संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलत होते. यावेळी त्यांनी बदलत्या जगात सातत्याने शिकत राहण्याचे महत्त्व अधोरेखित केले. समारंभात बोलताना मोदी म्हणाले की, विद्यार्थी आज केवळ पदवी घेऊन जात नाहीत, तर ते मोठी स्वप्ने घेऊन पुढील प्रवासाला निघत आहेत. तुम्ही येथे आलेला पहिला दिवस आठवा. ही कॅम्पस लाईफ, तुमचे मित्र, शिक्षक, मेंटॉर आणि स्टाफ हे तुमचं कुटुंब बनलं आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना भावनिक आवाहन केले.पुढे ते म्हणाले की, तुमच्या प्रोफेसरांनी तुम्हाला घडवलं आहे. या कॅम्पसने तुम्हाला आकार दिला आहे. आयुष्यातील प्रत्येक यशात तुम्हाला या सर्वांची आठवण येईल. या नात्यांना कधीही विसरू नका, त्यांना तुमच्यासोबत घेऊन जा. विद्यार्थ्यांनी एकमेकांशी असलेले संबंध कायम राखावेत, असेही त्यांनी विशेषत्वाने सांगितले.जगातील वेगाने बदलणाऱ्या परिस्थितीवर भाष्य करताना मोदी म्हणाले की, जगातील स्ट्रॅटेजिक इक्वेशन आणि ग्लोबल पॉवर बॅलन्स झपाट्याने बदलत आहेत. यामागे तंत्रज्ञानाची गती ही सर्वात मोठी शक्ती आहे. पुढील २०-३० वर्षांत जग कसे असेल हे सांगणे कठीण आहे, मात्र बदल हे निश्चित आहेत.या बदलांमुळे आव्हाने निर्माण होतात, पण त्याचबरोबर संधीही निर्माण होतात, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना नव्या विचारांची तयारी ठेवण्याचे आवाहन केले. आव्हानांना संधीमध्ये बदलण्याची क्षमता ज्यांच्यात आहे, तेच पुढे जातात. आयआयटीने तुम्हाला हेच शिकवलं आहे, असे ते म्हणाले.

## बाफना भागात अनोळखी इसमाचा डोक्यात वार करुन खून

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील बाफना परिसरात एका अनोळखी इसमाचा डोक्यात वार करुन खून केल्याची घटना आज (शनिवार) सकाळी उघडकीस आली आहे.

बाफना परिसरात असलेल्या संगम कार बाजार या दुकानासमोर आज (शनिवार) सकाळी एक अनोळखी इसम मृत अवस्थेत आढळून आला. सकाळी दुकान उघडण्यासाठी आलेल्या व्यापाऱ्याला हा प्रकार निदर्शनास आला. त्यांनी तात्काळ घटनेची माहिती इतवारा पोलीसांना दिली. इतवारा पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. मयत अनोळखी इसम हा अंदाजे ३५ वयोगटातील असल्याचा अंदाज असून त्याच्या डोक्यावर गंभीर दुखापत झाल्याचे दिसून आले. पोलीसांनी सदरील प्रेत ताब्यात घेवून शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविले. शवविच्छेदनाचा अहवाल आल्यानंतरच नेमका प्रकार उघडकीस येईल. पोलीसांनी सदरील व्यापारी संकुल परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे व तांत्रिक बाबी तपासायला प्रारंभ केला आहे. मयत अनोळखी इसमाची दुपारपर्यंत ओळख पोलीसांना पटलेली नाही. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.

## दानपेटी चोरी प्रकरणी मुख्यमंत्र्यांचे चौकशीचे आदेश

मुंबई/प्रतिनिधी-सिद्धिविनायक मंदिरातील दानपेटीतून दरवर्षी सुमारे १८ कोटी रुपयांची चोरी होत असल्याचा गंभीर आरोप मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केल्यानंतर राज्यात खळबळ उडाली होती. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंदिरातील मागील पाच वर्षांतील देणगी व दान संकलनाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे या बहुचर्चित प्रकरणाचा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## लोटस स्पा मसाज सेंटरवर पोलीसांची धाड

### चार महिलांची सुटका;चालकास अटक

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील आनंदनगर भागात असलेल्या लोटस स्पा मसाज सेंटरवर शुक्रवारी रात्री स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी धाड टाकुन चार महिलांची पोलीसांनी सुटका केली. स्पा मसाज सेंटरच्या चालकास अटक केली आहे.

लोटस स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरु असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या आदेशावरुन व स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसाच्या एका पथकाने बनावट ग्राहक तयार करुन मसाज सेंटरवर पाठविण्यात आले. मसाज सेंटरचा चालक व बनावट ग्राहक यांच्यामध्ये संवाद झाला. चालकाने ग्राहकाकडे रक्कमेची मागणी केली. त्यानंतर ग्राहकाने इशारा करताच काही वेळातच पोलीसांच्या **पान ४ वर**



## व्हय रं भाऊ! विद्यार्थ्यांसाठी 'नो स्लॉट', पण राजकारणासाठी 'फुल टाइम'!



**दृष्टीक्षेप**

**प्रदीप नागापूरकर**

नांदेड-व्हय रं भाऊ, पावसाळी अधिवेशन सुरू झालं म्हणे २२ जुलैपासून आणि आता अठरा दिवस झाले. पण हे अधिवेशन आहे की 'हायड अँड सीक' चा खेळ, हेच कळेना! कारण देशाचे दोन मोठे स्टार पंतप्रधान आणि गृहमंत्री संसदेत दिसतच नाहीत. बहुतेक ते 'वर्क फ्रॉम समव्हेअर' करत असावेत!

इकडे नीट पेपरफुटीचा गोंधळ. विद्यार्थी केव्हापासून आंदोलन करतायत, हे कुणी नीट सांगू शकत नाही. कारण सरकारच्या डायरीत बहुतेक हा विषय 'नंतर बघू' या पानावर ठेवला असावा. मुलं म्हणतात, ''भविष्याचं काय?'' आणि सरकार म्हणतं, ''थांबा, आधी अजून थोडं भविष्य घडू द्या!'' एक दिवस विद्यार्थ्यांनी संसदेकडे मोर्चा काढला. आशा होती, आज काहीतरी होईल. झालेही! भाजपचे मोठे नेते जे. पी. नड्डा दहा मिनिटं भेटले. अरे, दहा मिनिटांत तर चहा पण संपत नाही, मग प्रश्न कसा संपणार? पण चालायचंच, 'मीटिंग झाली' हे तरी म्हणता आलं! त्याच वेळी वांगचुकांना उपोषणस्थळावरून हलवलं. म्हणजे एकीकडे ''या, बोला'' आणि दुसरीकडे ''चला, उठा!'' वा रं भाऊ, व्यवस्थेची टाइमिंग भारीच!

२२ तारखेचा मोर्चा तर एकदम 'ॲक्शन सीन' निघाला. लाठीहल्ला, पॅलेट गन विद्यार्थ्यांना वाटलं, आपण आंदोलनाला आलो की, एखाद्या चित्रपटाच्या शूटिंगला? वरून गुन्हेही दाखल! म्हणजे 'एंट्री फ्री', पण 'एग्झिट चार्जेबल'! या सगळ्यावर प्रतिक्रिया येतायत. पण सरकारकडून शांतता. मग एके रात्री बारा वाजता पंतप्रधान इंस्टाग्रामवर येतात. विद्यार्थ्यांना वाटलं, आता काहीतरी उत्तर मिळेल. पण ते लाईव्ह होतं की 'गुड नाईट स्टोरी', हेच समजलं नाही! नंतर संघाचे सरसंघचालक मुंबईत येऊन विद्यार्थ्यांशी चर्चा करतात. देशभक्तीचे धडे देतात. आता बहुतेक पुढच्या परीक्षेत एक विषय वाढेल, ''देशभक्ती १०० मार्क्स''! आणि पास झालं की, प्रमाणपत्र मिळणार! आणि इकडे पंतप्रधान खासदारांशी तासभर चर्चा करतात तेही पक्ष बदलून आलेल्यांशी. म्हणजे विद्यार्थ्यांसाठी 'नो स्लॉट', पण राजकारणासाठी 'फुल टाइम'!

व्हय रं भाऊ, हे सगळं पाहून वाटतं देश चालतोय की कॉमेडी शो सुरू आहे? संसद म्हणजे सेट, नेते म्हणजे कलाकार, आणि विद्यार्थी? ते बिचारे प्रेक्षक! शेवटी एकच विद्यार्थी प्रश्न विचारतायत, पण उत्तर कुणी देणार? की हेही 'पुढच्या भागात पाहा' असंच चालणार? व्हय रं भाऊ, पुढचा एपिसोड कधी येणार?

## खा.सुप्रिया सुळेंसह रा.कॉं.चे ८ खासदार मोदींना भेटणार

नवी दिल्ली:राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे खासदार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सोमवारी सकाळी ११ वाजता भेट घेणार आहेत. पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली ८ खासदार या बैठकीस उपस्थित राहणार असल्याची माहिती पक्षाकडून देण्यात आली.

महाराष्ट्रात निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या गंभीर प्रश्नासह विविध विकासकामांशी संबंधित मुद्दे या भेटीत मांडले जाणार आहेत. राज्यातील परिस्थिती लक्षात घेता केंद्र सरकारकडून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी पक्षाकडून केली जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे.दरम्यान, परदेशी निधी नियमन (एफसीआरए) विधेयकाबाबत राष्ट्रवादी कॉंग्रेसने आपला विरोध कायम ठेवला आहे. या विधेयकावर घाई न करता सविस्तर चर्चा व्हावी, अशी भूमिका पक्षाने घेतली आहे. तसेच डिलिमिटेशन विधेयकाबाबत इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्षांशी चर्चा करूनच भूमिका ठरवली जाईल, असेही सुळे यांनी स्पष्ट केले.याशिवाय शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरून राज्य सरकारवर टीका करताना, कर्जमाफीसाठी कठोर निकष ठेवले जात असताना इतर योजनांमध्ये सवलती देण्यात येत असल्याचा आरोपही पक्षाने केला आहे.

# उत्तरदायित्वापासून पळवाट?

**देशाच्या सध्याच्या राजकीय घडामोडींमध्ये एक विचित्र विसंगती प्रकर्षाने जाणवते आहे. एका बाजूला सरसंघचालक मोहन भागवत विद्यार्थ्यांशी संवाद साधत आंदोलनकर्त्यांना 'देशप्रेमी' ठरवतात, तर दुसऱ्या बाजूला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संवाद केवळ इंस्टाग्रामसारख्या सोशल मीडिया माध्यमांपुरता मर्यादित दिसतो. प्रत्यक्ष प्रश्नांना सामोरे जाण्याऐवजी आभासी संवाद साधण्याची ही पद्धत केवळ प्रतिमा निर्मिती पुरती आहे का, की वास्तवातील कठोर प्रश्न टाळण्याचा प्रयत्न आहे?, हा प्रश्न आता अधिक तीव्र होत आहे.संसद अधिवेशन सुरू असताना देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री यांची अनुपस्थिती ही लोकशाहीसाठी अत्यंत गंभीर बाब मानली पाहिजे. गेल्या दहा-बारा दिवसांपासून गृहमंत्री संसदेत फिरकलेले नाहीत, तर पंतप्रधानही विरोधकांच्या प्रश्नांना सामोरे जाण्यापासून दूर राहिल्याचे चित्र आहे. संसद ही लोकशाहीची सर्वोच्च संस्था असून, इथेच सत्ताधाऱ्यांना जनतेसमोर उत्तरदायित्व स्वीकारावे लागते. मात्र, याच व्यासपीठापासून दूर राहणे हे लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे.याच काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी एनडीएतील घटक पक्षांच्या खासदारांसोबत तासन्तास बैठक घेत असल्याचे चित्र समोर येते. या बैठका केवळ समन्वयासाठी आहेत की; नव्या राजकीय समीकरणांची मांडणी करण्यासाठी?, हा प्रश्न आता सामान्य नागरिकांनाही पडू लागला आहे. कारण, जेव्हा देशात विद्यार्थी आंदोलनासारखे गंभीर प्रश्न उभे ठाकतात, तेव्हा सत्ताधाऱ्यांनी प्राधान्य कोणत्या गोष्टींना द्यावे, हे ठरवणे आवश्यक असते. जनतेच्या प्रश्नांवर उत्तर देणे की सत्तेची गणिते मांडणे; या दोन पर्यायांपैकी कोणता पर्याय निवडला जात आहे, हे सध्याच्या घडामोडींवरून स्पष्ट दिसते.मोहन भागवत यांच्या संवादातून आंदोलनाचा अधिकार मान्य केला जातो, परंतु आंदोलनकर्त्यांवर होणाऱ्या कारवाईबाबत स्पष्ट भूमिका घेतली जात नाही. ही दुहेरी भूमिका सत्ताधारी विचारसरणीतील संभ्रम अधोरेखित करते. एका बाजूला विद्यार्थ्यांचे कौतुक, तर दुसऱ्या बाजूला त्यांच्याच प्रश्नांकडे दुर्लक्ष, ही विसंगती केवळ शब्द आणि कृतीतील अंतर दाखवते. पंतप्रधानांचा सोशल मीडियावरून संवाद साधण्याचा प्रयत्न हा आधुनिक काळातील माध्यमांचा वापर मान्य असला, तरी तो प्रत्यक्ष उत्तरदायित्वाची जागा घेऊ शकत नाही. संसदेत उपस्थित राहून विरोधकांच्या प्रश्नांना उत्तरे देणे, ही पंतप्रधानांची घटनात्मक जबाबदारी आहे. जर हीच जबाबदारी टाळली जात असेल, तर ते लोकशाहीच्या आरोग्यासाठी घातक आहे. कारण, प्रश्न विचारणे हा विरोधकांचा हक्क आहे आणि त्या प्रश्नांना उत्तर देणे ही सत्ताधाऱ्यांचे कर्तव्य आहे.सध्याच्या परिस्थितीत एक गोष्ट स्पष्टपणे दिसून येते, राजकारणाचे केंद्रबिंदू हळूहळू जनतेच्या प्रश्नांपासून दूर जाऊन सत्तेच्या समीकरणांकडे वळत आहेत. एनडीएतील बैठका, संवादाचे आभासी माध्यम आणि संसदेकडे दुर्लक्ष; या सर्व घटनांचा एकत्रित विचार केल्यास, भाजप नव्या राजकीय समीकरणांची जुळवाजुळव करत आहे का?, अशी शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे.मात्र, कोणतीही राजकीय समीकरणे टिकण्यासाठी जनतेचा विश्वास अत्यावश्यक असतो. तोच विश्वास जर डळमळीत झाला, तर कोणतीही रणनीती दीर्घकाळ टिकू शकत नाही. लोकशाही ही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसून ती सतत चालणारी प्रक्रिया आहे, ज्यात संवाद, उत्तरदायित्व आणि पारदर्शकता यांना अत्यंत महत्त्व असते. आज गरज आहे ती सत्ताधाऱ्यांनी आत्मपरीक्षण करण्याची. संसदेत उपस्थित राहून जनतेच्या प्रश्नांना उत्तरे देणे, आंदोलनकर्त्यांशी संवाद साधणे आणि प्रशासनातील पारदर्शकता वाढवणे, या गोष्टींमुळेच लोकशाही मजबूत होऊ शकते. अन्यथा, राजकीय समीकरणांची ही फेरमांडणी लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांनाच हादरा देणारी ठरेल.**

# "ही जळफळाट समजते"

''जंतरमंतरचे आंदोलन हे भाजपा विरोधी नसून अराजकतेची नांदी आहे,'' असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय सहसरकार्यवाह श्री. अतुलजी लिमये यांनी अ.भा.वि.प.च्या प्रांत कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी वक्तव्य केले. त्यांच्या या विधानावरून असे स्पष्ट दिसते की जंतरमंतर आंदोलनात सर्वसमावेशक जनता विद्यार्थी, युवक, शेतकरी, कामगार, महिला, शीख संप्रदाय, मुस्लिम, आंबेडकरवादी गट, तृतीयपंथी, फेरीवाले मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्यामुळे त्यांना याचा त्रास होत आहे.

कुठलेही आंदोलन हे राजकीय व्यवस्थेने निर्माण केलेल्या किंवा राबविलेल्या धोरणांविरोधात संविधानिक मार्गाने व्यक्त केलेला विरोध असतो. ही साधी गोष्ट समजण्याइतपत आपण अज्ञानी नक्कीच नाही. आपल्याशी संलग्न असलेली एबीव्हीपीचे विद्यार्थी मात्र या आंदोलनापासून अलिप्त का राहिले?, नीट पेपर घोटाळा हा विद्यार्थी वर्गाचा प्रश्न नव्हता का? सतत होणारी पेपरफुटी ही शासकीय यंत्रणेची जबाबदारी नाही का? आपण राबवत असलेल्या किसान नीती, कामगार नीती, शैक्षणिक नीती, न्यायनीती, प्रशासन नीती, सामाजिक सुरक्षा नीती, महिला सुरक्षा नीती; या सर्व बाबी आपण किती गांभीर्याने हाताळत आहात, हे संपूर्ण देश पाहत आहे.

देशाची आणि देशबांधवांची काळजी आपण व आपला संघ परिवार १९२५ पासून किती निष्ठेने घेत आहात, हे जागरूक भारतीयांना आता स्पष्ट झाले आहे.तिरंग्याप्रती आपली निष्ठा व प्रेम याबद्दलही आम्ही सजग आहोत.विद्रोही हा शब्द तुम्हाला किती खटकतो, हेही जनतेच्या लक्षात आले आहे. मात्र आम्ही संस्कृत भाषेबाबत संत ज्ञानेश्वरांच्या भूमिकेला विद्रोह मानतो; संत तुकाराम महाराजांच्या विचारांना विद्रोह



समजतो. शहीद भगतसिंग, शहीद अशफाकउल्ला खान ते शहीद बाबू गेनू कांबळे यांच्या कार्याला आणि बलिदानाला आम्ही विद्रोहाचेच प्रतीक मानतो.इंग्रज सत्तेशी तडजोड करणे, स्वजातीय लाभाचे गणित मांडणे; याला आम्ही देशाशी व देशबांधवांशी गद्दारी मानतो.

**कॉ.अरुण रेणके**
उमरगा

हे सर्व आम्हाला समजत नाही, असा समज करून घेणे हा आपलाच भ्रम आहे. कारण आज आम्ही शिक्षित आणि उच्चशिक्षित झालो आहोत. त्यामुळे आम्हाला फसवणे किंवा संभ्रमात टाकणे आता शक्य नाही. होय, आम्ही इतिहास, तत्त्वज्ञान आणि व्यवहार यांचे दस्तऐवजीकरण करतो आणि समाजाभिमुख नीती आखतो. तसेच टीका आणि आत्मटीका या दोन्हींचा उपयोग करून आपला मार्ग दुरुस्त करतो. परकीय सत्ताकाळात स्वकीयांचे हित जपण्याची तुमची तथाकथित 'संस्कृती' नेमकी कुठे होती? आज तुम्ही संसदीय लोकशाही मूल्यांची हानी करत आहात. ईव्हीएम संदर्भातील प्रश्न, लोकप्रतिनिधींची खरेदी-विक्री, ईडी, न्यायव्यवस्था, पोलीस यंत्रणा यांचा वापर करून राजकीय दडपशाही या सर्व गोष्टींमुळे लोकशाही मूल्यांची अधोगती होत आहे.

आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आठवण काढावी लागत आहे, यातच आमच्या विचारांचा विजय दडलेला आहे. गांधी हत्या 'वध' म्हणून संबोधणे, फाळणी व ५५ कोटी रुपयांच्या मुद्द्यावर गांधींच्या हत्येचे समर्थन करणे; हा तद्दन खोटा प्रचार आहे, हे आम्हाला माहीत आहे. न्यायव्यवस्था, प्रशासन, पोलीस कारभार, देशांतर्गत सुरक्षा, शिक्षण या सर्व क्षेत्रांमध्ये सत्ताधारी व्यवस्थेची कार्यपद्धती लोकशाहीच्या विरोधात जात असल्याचे स्पष्ट दिसते. म्हणूनच भारतीय राज्यघटनेने दिलेल्या अधिकारांचा वापर करून बहुसंख्य जनता आणि युवा शक्ती रस्त्यावर उतरली आहे. हा बदल तुम्हाला सहन होत नाही, म्हणूनच तुमचा विरोध आणि संताप अशा वक्तव्यांतून दिसून येतो. तुम्ही यालाच ''अल्टरनेटिव्ह पॉलिटिक्स'' म्हणता. होय, आम्ही सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्याचा, म्हणजेच पर्यायी राजकीय नीतीचा आग्रह धरतो. तुम्ही सांगत असलेल्या विषमतावादी नीतीला आमचा ठाम आणि स्पष्ट विरोध आहे आणि तो कायम राहील, हे लक्षात ठेवा.

# पैठणी साडी:हातमाग परंपरेची वारसा

भारत हा विविध कला, संस्कृती, परंपरा आणि लोककौशल्यांनी समृद्ध असलेला देश आहे. भारतीय संस्कृतीच्या या वैभवशाली परंपरेमध्ये वस्त्रकलेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. देशातील विविध भागांमध्ये विकसित झालेल्या पारंपरिक



वस्त्रप्रकारांनी भारतीय संस्कृतीची ओळख जगभर निर्माण केली आहे. यामध्ये महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक असलेली पैठणी साडी ही विशेष उल्लेखनीय आहे. पैठणी ही केवळ एक साडी नसून ती महाराष्ट्राच्या इतिहासाची, कलात्मकतेची, परंपरेची आणि कुशल कारागिरांच्या अथक श्रमांची जिवंत साक्ष आहे. ७ ऑगस्ट रोजी साजरा होणाऱ्या राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त पैठणीसारख्या पारंपरिक हातमाग उत्पादनांचा गौरव करणे म्हणजे भारतीय कला, कौशल्य आणि श्रमसंस्कृतीचा सन्मान करणे होय. पैठणीच्या प्रत्येक धाग्यामध्ये महाराष्ट्राची संस्कृती, इतिहास, सौंदर्यदृष्टी आणि कारागिरांच्या पिढ्यान् पिढ्या जपलेल्या कौशल्याचा अनमोल ठेवा सामावलेला आहे.

पैठणीचा इतिहास अत्यंत प्राचीन आणि गौरवशाली आहे. महाराष्ट्रातील गोदावरी नदीच्या काठावर वसलेल्या प्राचीन पैठण नगरीच्या नावावरून या साडीला पैठणी हे नाव प्राप्त झाले. सातवाहन काळापासून पैठण हे व्यापार, संस्कृती आणि कलांचे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. प्राचीन काळात पैठण येथून तयार होणाऱ्या उत्कृष्ट दर्जाच्या वस्त्रांची देश-विदेशात मोठ्या प्रमाणावर मागणी होती. भारतीय रेशीम आणि सूती वस्त्रांच्या व्यापारात पैठणचे महत्त्वपूर्ण स्थान होते. रोमन साम्राज्याशी भारताचा व्यापार सुरू असताना पैठण परिसरातील वस्त्रांना मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. त्यामुळे पैठणीचा इतिहास हा केवळ एका साडीचा इतिहास नसून महाराष्ट्राच्या प्राचीन व्यापार, कला आणि सांस्कृतिक समृद्धीचा इतिहास आहे.पैठणी निर्मिती ही अत्यंत कौशल्यपूर्ण आणि संयमाची प्रक्रिया आहे. पारंपरिक पद्धतीने पैठणी तयार करण्यासाठी उच्च प्रतीच्या रेशमी धाग्यांचा वापर केला जातो. धाग्यांना विशिष्ट पद्धतीने रंग देणे, त्यांची योग्य मांडणी करणे, हातमागावर विणकाम करणे आणि नक्षीकाम साकार करणे यासाठी विणकरांना मोठे कौशल्य आवश्यक असते. एक उत्कृष्ट पैठणी तयार करण्यासाठी अनेक दिवस, कधी कधी अनेक महिने लागतात. विणकर आपल्या अनुभव, कल्पकता आणि कलात्मक दृष्टीच्या साहाय्याने प्रत्येक पैठणीला एक वेगळे रूप देतात. त्यामुळे प्रत्येक पैठणी ही एक स्वतंत्र कलाकृती मानली जाते. मशीनवर तयार होणाऱ्या वस्त्रांपेक्षा हाताने विणलेल्या पैठणीचे महत्त्व याच कारणामुळे अधिक आहे.

पैठणीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची आकर्षक रंगसंगती आणि वैशिष्ट्यपूर्ण नक्षीकाम. पारंपरिक पैठणीमध्ये मोर, कमळ, आंबी, नारळी, अश्रफी, वेलबुट्टी आणि विविध प्रकारच्या पारंपरिक आकृत्यांचा वापर केला जातो. पैठणीच्या पदरावर विणले जाणारे मोराचे चित्र हे तिची खास ओळख मानले जाते. भारतीय संस्कृतीमध्ये मोर हा सौंदर्य, समृद्धी आणि शुभतेचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे पैठणीच्या पदरावरील मोराची नक्षी विशेष आकर्षण निर्माण करते. सोन्या-चांदीच्या झरीचा वापर, रेशमी धाग्यांची चमक आणि रंगांची सुंदर सांगड यामुळे पैठणीला राजेशाही स्वरूप प्राप्त होते.महाराष्ट्रातील स्त्रियांच्या भावविश्वात पैठणीला अत्यंत मानाचे स्थान आहे. लग्नसमारंभ, सण-उत्सव, धार्मिक कार्यक्रम आणि विशेष प्रसंगी पैठणी परिधान करण्याची परंपरा अनेक वर्षांपासून चालत आली आहे. मुलीच्या विवाहाच्या वेळी माहेरकडून दिली जाणारी पैठणी ही प्रेम, आशीर्वाद आणि सन्मानाचे प्रतीक मानली जाते. अनेक कुटुंबांमध्ये आजी-आईकडून पुढील पिढीकडे पैठणी जपून ठेवण्याची परंपरा आहे. त्यामुळे पैठणी ही केवळ वस्त्र राहत नाही, तर ती कुटुंबाच्या आठवणी, भावना आणि सांस्कृतिक वारशाचा भाग बनते.

**सुजाता मोरे**

पैठणीच्या विकासामध्ये महाराष्ट्रातील विविध राजवटींचे योगदान राहिले आहे. सातवाहन काळापासून सुरू झालेली ही वस्त्रपरंपरा पुढे यादव, बहमनी, निजाम आणि मराठा काळात अधिक विकसित झाली. राजघराण्यांमध्ये पैठणीचा वापर प्रतिष्ठेचे आणि वैभवाचे प्रतीक म्हणून केला जात असे. विशेषतः मराठा काळात पैठणीला मोठा राजाश्रय मिळाला. दरबारातील स्त्रिया आणि उच्चवर्गीय समाजामध्ये पैठणीला विशेष स्थान होते. विविध राजवटींच्या प्रभावामुळे पैठणीच्या डिझाइनमध्ये, रंगांमध्ये आणि नक्षीकामामध्ये विविधता निर्माण झाली. या ऐतिहासिक प्रवासातून पैठणीने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.पैठणीच्या निर्मितीमध्ये विणकर समाजाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेक विणकर कुटुंबांनी पिढ्यान् पिढ्या या कलेचे जतन केले आहे. त्यांच्या हातातील कौशल्यामुळेच पैठणीसारखी अप्रतिम कलाकृती आजही अस्तित्वात आहे. मात्र, या पारंपरिक कलेमागे असलेल्या विणकरांच्या समस्या अनेकदा दुर्लक्षित राहतात. मोठ्या मेहनतीनंतर तयार होणाऱ्या पैठणीला योग्य बाजारभाव मिळणे, कच्च्या मालाच्या वाढत्या किमती, आर्थिक अडचणी आणि बदलत्या बाजारपेठेतील स्पर्धा या समस्या विणकरांसमोर आहेत. त्यामुळे पैठणीच्या संवर्धनाबरोबरच पैठणी विणणाऱ्या कारागिरांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

आधुनिक काळात पैठणीसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. यंत्रमागावर तयार होणाऱ्या स्वस्त साड्यांमुळे पारंपरिक हातमाग पैठणीला स्पर्धेला सामोरे जावे लागत आहे. अनेकदा बनावट किंवा कमी दर्जाच्या साड्यांना पैठणी म्हणून विकले जाते, त्यामुळे ग्राहकांची फसवणूक होते आणि अस्सल पैठणी तयार करणाऱ्या कारागिरांचे नुकसान होते. अस्सल पैठणीची ओळख, तिची गुणवत्ता आणि पारंपरिक वैशिष्ट्ये याबाबत ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. पैठणीसारख्या पारंपरिक वस्त्रांचे संरक्षण करण्यासाठी शासन, समाज आणि ग्राहक यांनी संयुक्त प्रयत्न करणे गरजेचे आहे.पैठणीच्या संवर्धनासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. पैठणीला भौगोलिक मानांकन मिळाल्यामुळे तिची स्वतंत्र ओळख अधिक मजबूत झाली आहे. विविध प्रदर्शनांमधून, सांस्कृतिक महोत्सवांमधून आणि डिजिटल माध्यमांद्वारे पैठणी देश-विदेशातील ग्राहकांपर्यंत पोहोचत आहे. आज अनेक विणकर आणि उद्योजक ऑनलाइन माध्यमांचा वापर करून थेट ग्राहकांशी संपर्क साधत आहेत. डिजिटल तंत्रज्ञानामुळे पारंपरिक कलेला आधुनिक बाजारपेठ उपलब्ध होत आहे. यामुळे पैठणी उद्योगाला नव्या संधी निर्माण होत आहेत.

बदलत्या काळानुसार पैठणीने आधुनिकतेशीही जुळवून घेतले आहे. पारंपरिक नक्षी आणि रंगसंगती जपत नवीन डिझाइन, विविध प्रकारचे रंग आणि आधुनिक फॅशनच्या गरजेनुसार पैठणीमध्ये प्रयोग केले जात आहेत. अनेक फॅशन डिझायनर्सनी पैठणीला आधुनिक पोशाखांमध्ये स्थान दिले आहे. त्यामुळे तरुण पिढीमध्येही पैठणीविषयी आकर्षण वाढत आहे. भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय फॅशन क्षेत्रात पैठणीला मिळणारी प्रसिद्धी ही तिच्या बदलत्या काळाशी जुळवून घेण्याच्या क्षमतेचे उदाहरण आहे.पैठणी ही पर्यावरणपूरक जीवनशैलीचेही प्रतीक आहे. हातमागावर तयार होणाऱ्या या साडीच्या निर्मितीमध्ये मोठ्या प्रमाणावर मानवी कौशल्याचा वापर केला जातो. यंत्राधारित मोठ्या प्रमाणातील उत्पादनाच्या तुलनेत हातमाग उद्योग पर्यावरणासाठी अधिक अनुकूल आहे. आज जगभरात शाश्वत फॅशन आणि पर्यावरणपूरक उत्पादनांना महत्त्व दिले जात आहे. या पार्श्वभूमीवर पैठणीसारख्या पारंपरिक हातमाग वस्त्रांचे महत्त्व अधिक वाढले आहे.

राष्ट्रीय हातमाग दिन हा भारतीय हातमाग परंपरेचा गौरव करण्याचा दिवस आहे. या दिवशी पैठणीसारख्या पारंपरिक वस्त्रांचा सन्मान करणे म्हणजे केवळ एका साडीचा गौरव करणे नव्हे, तर तिच्यामागील हजारो वर्षांच्या परंपरेचा, असंख्य विणकरांच्या श्रमांचा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा सन्मान करणे होय. पैठणीच्या प्रत्येक धाग्यामध्ये महाराष्ट्राचा इतिहास, कला आणि संस्कृती विणलेली आहे. त्यामुळे या वारशाचे संरक्षण करणे, विणकरांना प्रोत्साहन देणे आणि अस्सल हातमाग उत्पादनांचा स्वीकार करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.पैठणी ही महाराष्ट्राची ओळख आहे, अभिमान आहे आणि सांस्कृतिक संपत्ती आहे. तिच्या रेशमी धाग्यांमध्ये केवळ सौंदर्य नाही, तर परंपरा, श्रम, भावना आणि इतिहासाचा संगम आहे. राष्ट्रीय हातमाग दिनाच्या निमित्ताने आपण पैठणीसारख्या अमूल्य वारशाचे जतन करण्याचा आणि या कलेला पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला पाहिजे. कारण पैठणीचा प्रत्येक धागा हा केवळ साडीचा भाग नसून महाराष्ट्राच्या गौरवशाली संस्कृतीचा एक अमूल्य धागा आहे.

(लेखिका, पर्यटन प्रशासनशास्त्राच्या अभ्यासक आहेत)

# गजानन पाटील वडजे भारतीय सैन्यातून निवृत्त

नायगाव/प्रतिनिधी- मरवाळी येथील सुपुत्र श्री गजानन माणिकराव पाटील वडजे यांनी भारतीय सैन्यात तब्बल १६ वर्षे प्रामाणिकपणे, शिस्तबद्धपणे आणि निष्ठेने देशसेवा बजावून निवृत्ती स्वीकारली. त्यांच्या या गौरवपूर्ण सेवेबद्दल गावासह परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

भारतीय सैन्यातील सेवाकाळात त्यांनी विविध ठिकाणी देशाच्या सुरक्षेसाठी कर्तव्य बजावत शिस्त, समर्पण आणि राष्ट्रनिष्ठेचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या कार्यामुळे कुटुंबासह मरवाळी गावाचेही नाव अभिमानाने उंचावले आहे.त्यांच्या निवृत्तीनिमित्त नायगाव ते नरसी मार्गे मरवाळी या मार्गावर गावकऱ्यांच्या वतीने भव्य स्वागत मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. मिरवणुकीत शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत फटाक्यांची आतषबाजी, पुष्पवृष्टी आणि घोषणांच्या गजरात त्यांचे जल्लोषात स्वागत केले. मरवाळी येथे स्वराज्य प्रतिष्ठान, मरवाळी यांच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात श्री गजानन पाटील वडजे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला गावातील नागरिक, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थितांनी श्री गजानन माणिकराव पाटील वडजे यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देत त्यांच्या देशसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज व आई तुळजाभवानी यांच्या आशीर्वादाने त्यांना निरोगी, सुखी व यशस्वी आयुष्य लाभावे, अशी प्रार्थना व्यक्त करण्यात आली. देशसेवा हीच ईश्वरसेवा या भावनेतून १६ वर्षे राष्ट्रसेवा करणाऱ्या श्री गजानन माणिकराव पाटील वडजे यांच्या कार्याचा परिसरात गौरव करण्यात आला. त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचा, शिस्तीचा आणि समर्पणाचा आदर्श युवकांनी घ्यावा, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

## भिऊ नका संदेश कोणासाठी ? ;उद्धव ठाकरेंचा सवाल

मुंबई/प्रतिनिधी-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भिऊ नका, मी तुमच्या पाठीशी आहे असा दिलेला संदेश नेमका कोणासाठी होता, असा सवाल उपस्थित करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी तीव्र हल्लाबोल केला. सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष आणि चिन्हासंदर्भातील सुनावणी सुरू असताना हा संदेश दिला गेला, यावरून ठाकरे यांनी संशय व्यक्त केला आहे. शिवसेना शिंदे गटाचे खासदार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अलीकडेच दिल्लीत जाऊन पंतप्रधान मोदी यांची भेट घेतली होती.

# किनवट कृ.उ.बा.समितीचे सचिव राठोड तडकाफडकी निलंबित

## एफडी घोटाळ्याचा स्फोट:अडीच कोटीचा केला गैरव्यवहार

किनवट/प्रतिनिधी-किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव रवींद्र राठोड यांना आज (८ ऑगस्ट) रोजी तातडीची विशेष सभा घेऊन तडकाफडकी निलंबित केले आहे. विशेष म्हणजे सभापती तथा पदसिद्ध अध्यक्ष गजानन मुंडे हे गैरहजर होते. सभेचा कोरम पूर्ण असल्यामुळे उपसभापती राहुल गेमसिंग नाईक यांच्या अध्यक्षतेखाली बाजार समितीची सभा पार पडली. सचिव राठोड यांच्यावर आर्थिक गैरव्यवहारासह विविध आरोपांच्या चौकशीनंतर दोषारोप सिद्ध झाल्यावरुन पणन संचालक शरद जरे यांच्या आदेशावरून सदरची कारवाई केली. चौकशीसाठी त्रीसदस्यीय संचालकांची समिती स्थापन करणे व प्रभारी सचिव नियुक्त करणे असे तीन ठराव एकमताने पारित करण्यात आले.

या बैठकीत पणन संचालकांच्या सूचनेनुसार बाजार समितीच्या २ कोटी ५२ लाख ८६ हजार ६७५ रुपयांच्या मुदत ठेवींची बेकायदेशीरपणे उचल करून खाजगी कामासाठी वापर केल्याचा ठपका ठेवत सचिव रवींद्र राठोड यांना तात्काळ निलंबित करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. सचिव रवींद्र राठोड यांना निलंबित करून त्यांच्या जागी विकल रंगनेनीवार यांची प्रभारी सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर बाजार समितीतील संपूर्ण गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय संचालकांची समिती गठीत करण्यात आली. यामध्ये संचालक सोपान केंद्रे, श्रीराम कांदे व प्रल्हाद सातव यांचा समावेश असून, त्यांना वस्तुनिष्ठ चौकशी करून अहवाल सादर



करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. असे एकूण तीन ठराव एकमताने पारित करण्यात आले आहेत. दरम्यान, सभापती गजानन मुंडे यांनी दोन महिला संचालकांच्या तक्रारीचे कारण देऊन उपसभापतींसह इतर संचालकांना बरखास्त केल्याचा दावा केला होता. मात्र, तो निर्णय पूर्णपणे बेकायदेशीर व नियमबाह्य असल्याचे स्पष्ट झाले आहे. महिला संचालक कुसुम गणपत मुंडे व अनुसया मनोहर पेंदोर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, सभापती मुंडे यांनी आमच्या नावे खोटे अर्ज तयार करून दिशाभूल केली आहे. यासंदर्भात सहाय्यक उपनिबंधक, सहकारी संस्था, किनवट यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. या विशेष बैठकीला संचालक सोपान केंद्रे, श्रीराम कांदे, अनिल पाटील कऱ्हाळे, प्रल्हाद सातव, बालाजी बामणे, राजू सुरोशे, प्रेमसिंग जाधव, प्रेमसिंग साबळे, नवीन राठोड, कैलास बीजमवार, सुनील घुगे, शेख हैदर शेख मुसा, अब्दुल सत्तार, विद्या दासरवार, अनुसया पेंदोर व कुसुम गणपत मुंडे असे एकूण १७ संचालक उपस्थित होते. बाजार समितीतील या आर्थिक गैरव्यवहारामुळे सभापती आणि संचालक मंडळातील वाद आता अधिकच पेटला असून, हा राजकीय व प्रशासकीय संघर्ष पुढे कोणते वळण घेतो, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## किनवट मार्केट कमिटीच्या सभापतीची चौदा संचालकांविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार

किनवट/प्रतिनिधी-किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सभापती व उपसभापती यांच्यासह १४ संचालकामधील वाद विकोपाला गेला आहे. मार्केट कमिटीचे सभापती गजानन मुंडे यांनी उपसभापतीसह १४ संचालका विरोधात किनवट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीमधील घोटाळा चांगलाच गाजत आहे. मार्केट कमिटीचे सचिव रवींद्र राठोड यांनी बँकेतील अडीच कोटी रुपयांची एफडी परस्पर उचलून त्याचा गैरव्यवहार केला. तसेच कार्यालयातील कामामध्येही अनियमितता आढळून आल्याने राज्याच्या पणन संचालकाने रवींद्र राठोड यांना निलंबित करण्याच्या सुचना दिल्या आहेत. तसेच मार्केट कमिटीचे सभापती गजानन मुंडे व उपसभापती राहुल नाईक यांच्यासह १४ संचालकांमध्ये वाद चांगलाच विकोपाला गेला. शनिवारी मार्केट कमिटीचे सभापती गजानन मुंडे यांनी उपसभापती राहुल नाईक व चौदा संचालकाविरोधात किनवट पोलीस ठाण्यात जावून तक्रार दिली. मार्केट कमिटीच्या निधीचा गैरवापर, बँकेतून परस्पर रक्कम काढणे, मार्केट कमिटीतील आर्थिक गैरव्यवहार व अन्य आरोप राहुल नाईक व चौदा संचालकां विरोधात तक्रारी करण्यात आल्या आहेत.

## खा.आष्टीकरांचे पक्षांतर:न.पा.मधील शिवसेना (उबाठा) चे नगरसेवक बैचेन

हदगाव/प्रतिनिधी-हिंगोली लोकसभेचे खा.नागेश पाटील आष्टीकर यांनी शिवसेना (उबाठा) पक्षाला जय महाराष्ट्र करत शिवसेना (शिंदे) गटात प्रवेश केला आहे. या पक्षांतराचे जोरदार राजकीय पडसाद आता हदगाव नगरपरिषदेत उमटू लागले आहेत. नगरपरिषदेतील शिवसेना (उबाठा) च्या सात नगरसेवकांची स्थिती यामुळे अत्यंत बिकट झाली असून, कोणत्या पक्षात जावे की शिवसेनेतच राहावे अशी द्विधा अवस्था झाल्याची चर्चा सध्या शहरात रंगली आहे.

हदगाव नगरपरिषदेतील 'उबाठा' गटाचे सातही नगरसेवक हे खा. नागेश पाटील आष्टीकर यांचे खंदे समर्थक मानले जातात. मात्र, आपल्या मुख्य नेत्यानेच अचानक शिवसेना (शिंदे) गटाची वाट धरल्यामुळे या सर्व नगरसेवकांसमोर मोठे राजकीय धर्मसंकट उभे राहिले आहे. ठाकरे गटासोबत एकनिष्ठ राहायचे की, आपल्या नेत्याच्या पावलावर पाऊल



ठेवत शिवसेना (शिंदे)गटात प्रवेश करायचा, यावर अद्याप या नगरसेवकांनी कोणतीही अधिकृत भूमिका स्पष्ट केलेली नाही. खासदार दिल्लीत व्यस्त असल्याने नगरसेवक आपला पुढील राजकीय मार्ग काय असावा, या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी सध्या खासदारांच्या संकेताची वाट पाहत आहेत. मात्र, आमचे नेते खा.आष्टीकर सध्या दिल्लीतील कामांमध्ये व्यस्त असल्याने निर्णय प्रलंबित आहे, असे समर्थकांकडून सांगितले जात आहे. त्यातच, काही नगरसेवक शिवसेना (शिंदे) गटात जाण्यास अजिबात उत्सुक नसल्याची छुपी माहिती समोर येत आहे. त्यामुळे खासदारांनी दिल्लीचे कार्यक्रम आटोपून आधी आमच्या राजकीय भविष्याकडे लक्ष द्यावे, अशी उद्विग्न अपेक्षा या नगरसेवकांकडून व्यक्त केली जात आहे. हदगाव नगरपरिषदेतील सध्याचे पक्षीय संख्याबळ पाहता, हे सातही नगरसेवक अत्यंत निर्णायक भूमिकेत आहेत. हे नगरसेवक पक्षांतर करतात की ठाकरे गटातच ठाम राहतात,यावर नगरपरिषदेची आगामी सत्ताकारणाची गणिते अवलंबून असतील. या नगरसेवकांच्या संभाव्य निर्णयावर संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे.

## हनुमानगड ते काळेश्वर कावड यात्रेचे आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-माँ तुळजा भवानी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, नांदेडच्या वतीने श्रावण महिन्यानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या कावड यात्रेचा यंदा नववा वर्ष सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी श्रीक्षेत्र हनुमानगड येथून श्रीक्षेत्र काळेश्वर मंदिर, विष्णुपुरीपर्यंत ही कावड यात्रा प्रस्थान करणार असून शिवभक्तांमध्ये याबाबत मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे.

श्रावण महिन्याच्या पावन तिसऱ्या सोमवारी सकाळी ९ वाजता यात्रेला प्रारंभ होणार आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शेकडो शिवभक्त कावड घेऊन पायी चालत भगवान शंकराच्या दर्शनासाठी आणि जलाभिषेकासाठी मार्गक्रमण करणार आहेत. या यात्रेदरम्यान धार्मिक घोषणाबाजी, भजन-कीर्तन आणि भक्तिमय वातावरणात संपूर्ण परिसर दुमदुमून जाणार आहे.श्रीक्षेत्र हनुमानगड ते श्रीक्षेत्र काळेश्वर मंदिर, विष्णुपुरी हा मार्ग पार करताना शिवभक्त मोठ्या श्रद्धेने कावड वाहून नेतात. कावड यात्रेला नांदेड शहरासह परिसरातील विविध भागांतून भाविक सहभागी होत असून ही यात्रा श्रद्धा, एकता आणि भक्तीचे प्रतीक म्हणून ओळखली जाते.कावड यात्रेत सहभागी होण्यासाठी आयोजक समितीच्या वतीने सर्व शिवभक्तांना आवाहन करण्यात आले आहे. रविसिंह चौहान, संतोष औंढेकर, माधवसिंह ठाकूर, सुनील डोईजड, ओमसिंह परमार, संतोष शिंदे, विनोद देशमुख, साई परिहार आदींनी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून यात्रेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## खाद्य तेलाचा पुनर्वापर करून पदार्थांची विक्री

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर शहर व तालुक्यातील प्रमुख बाजारपेठेत भजी, पापडी, जिलेबी, आदी पदार्थ तळून विक्री केला जात असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.त्यामुळे सर्वसामान्य ंना नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून अन्न सुरक्षा नियमाचे उल्लंघन होत असल्याची चर्चा आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार अनेक ठिकाणी एकाच तेलाचा वारंवार वापर करून खाद्यपदार्थ तयार केले जात आहेत., अशा तेलांच्या सतत वापरामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याने ग्राहकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. या प्रकाराची अन्न व औषध प्रशासन तसेच अन्न सुरक्षा विभागाने तातडीने दाखल घेऊन संबंधित व्यवसायिकांची तपासणी करावी, वापरल्या जाणाऱ्या तेलाचे नमुने तपासण्यासाठी घ्यावेत आणि नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वर कठोर कारवाई करावी, असे मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून होत आहे. याप्रकरणी संबंधित विभागाने नियमित तपासणी मोहीम राबवून नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार अन्न उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात अशी अपेक्षा ही व्यक्त केली जात आहे.

## वन वाहनाला धडक देऊन पळ काढण्याचा प्रयत्न;तिघांना १४ दिवस न्यायालयीन कोठडी

किनवट/प्रतिनिधी-बेंदी तांड्याजवळ वनविभागाच्या पथकाने केलेल्या कारवाईतील आरोपींना सुरुवातीला न्यायालयाने तीन दिवसांची वन कोठडी सुनावली होती, आज ८ ऑगस्ट रोजी पुन्हा न्यायालयात हजर केल्यानंतर किनवट न्यायालयाने तीनही आरोपींना चौदा दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

वन विभागाच्या वाहनाला धडक देऊन पळून जाण्याचा प्रयत्न केला होता. याप्रकरणी वनविभागाने तत्परतेने कारवाई करत आरोपींना रंगेहाथ पकडून त्यांच्याविरोधात भारतीय वन अधिनियम १९२७ च्या विविध कलमांन्वये वन गुन्हा क्र. ०२/२०२६ अन्वये गुन्हा दाखल केला. सुरुवातीला आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची वन कोठडी सुनावली होती. वन कोठडीची मुदत संपल्यानंतर वनविभागाने तपास पूर्ण करून आरोपी शेख कासीम शेख उस्मान, शेख जावेद शेख रफिक आणि शेख सोहेल शेख शौकत यांना आज, ८ ऑगस्ट रोजी वन अधिकारी एम.आर. गुरसाली यांच्यामार्फत किनवट न्यायालयात पुन्हा हजर केले.रिमांड कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी पी.एम.मानकर यांनी तीनही आरोपींना २१ ऑगस्टपर्यंत १४ दिवस न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.



महानगरपालिका, गुरुद्वारा लंगर साहिब व वृक्षमित्र फाउंडेशन नांदेडच्या वतीने हरित नांदेड २०२६ महा वृक्ष लागवड कार्यक्रमा अंतर्गत श्री हनुमान गड संस्थान येथे माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी हनुमानगड देवस्थानचे मुख्य विश्वस्त महंत गरुडदासजी त्यागी महाराज,आ.अमरनाथ राजूरकर, महापौर कविता संतोष मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती वीरेंद्रसिंग गाडीवाले, आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, सभागृह नेते महेश कनकदंडे,सभापती सदिच्छा सोनी पाटील,उपसभापती लांडगे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, नगरसेवक किशोर स्वामी, नगरसेवक प्रशांत तिडके यांच्यासह इतर उपस्थित होते.

## माझ्या रॅलीवर हल्ला,अटकेचा कट-जरांगे यांचा फडणवीसांवर गंभीर आरोप

सोलापूर: आंदोलना दरम्यान मला अटक होऊ शकते किंवा माझ्या रॅलीवर हल्ला घडवून आणण्याचा कट रचला जात आहे, असा सनसनाटी आरोप मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेवून केला आहे.

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी पश्चिम महाराष्ट्र दौऱ्याची सुरुवात करत शनिवारी (८ ऑगस्ट) सोलापूरमध्ये जोरदार राजकीय आरोपांची सरबत्ती केली. माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप करत, जरांगे म्हणाले की, पहाटे पाच वाजता मला याची माहिती मिळाली. फडणवीस माझ्याविरोधात शेवटचा डाव आखत आहेत. रॅलीवर दगडफेक, बंदोबस्त काढून घेणे आणि मला अटक करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यांच्या सर्व डावांचा फज्जा उडाल्यामुळे आता हा शेवटचा प्रयत्न आहे.मराठा समाजाच्या पाठबळावरच सत्तेत आल्याचा उल्लेख करत त्यांनी इशारा दिला, फडणवीस यांनी हे लक्षात ठेवावे की, मराठ्यांमुळेच ते निवडून आले आहेत. २९ तारखेला आम्ही आमची ताकद दाखवू.दरम्यान, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही त्यांनी निशाणा साधला. कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यासाठी थेट पत्र लिहिले जात आहे, असा आरोप करत त्यांनी काही कागदपत्रेही दाखवली. नऊ जिल्ह्यांतील ६१ दाखले रद्द झाल्याचा दावा त्यांनी केला असून, रद्द झालेले प्रमाणपत्र तात्काळ दुरुस्त करा, अन्यथा रान उठवू, असा इशारा त्यांनी दिला.सरकारमधील काही मंत्र्यांकडून संपर्क साधला जात असल्याचा दावा करत जरांगे म्हणाले, मला अनेक फोन आले. काही मंत्र्यांनी शेकडो कॉल केले, पण मी कुणाचाही कॉल घेतला नाही. चूक सुधारली तर पुन्हा पूर्वीसारखे संबंध ठेवू, अन्यथा हिसका दाखवू.जरांगे पाटील यांच्या या तीव्र आरोपांमुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले असून, मुख्यमंत्री आणि सरकारकडून यावर काय प्रतिक्रिया येते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सहकारी बँकांनी काळानुरूप बदलले पाहिजे;शहा यांचा ठाम संदेश

मुंबई/प्रतिनिधी- शहरी सहकारी बँकिंग क्षेत्राला थेट संदेश देत काळानुरूप बदल न केल्यास सहकारी बँकिंग टिकणार नाही असा स्पष्ट इशारा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिला.

नॅशनल अर्बन को-ऑपरेटिव्ह फायनान्स अँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या नवनिर्मित मुख्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहकारातून समृद्धी या संकल्पनेला साकार करायचे असेल, तर सहकारी बँकांनी आधुनिक तंत्रज्ञान, सायबर सुरक्षितता आणि पारदर्शकता यांचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे, असे शहा यांनी ठामपणे सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की, शहरी बँकिंग अधिक सक्षम आणि स्पर्धात्मक करण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध आहे.शहा पुढे म्हणाले, लहान आणि मध्यम सहकारी बँकांना आधुनिक तंत्रज्ञानाचा खर्च परवडावा, यासाठी अम्ब्रेला संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. यामुळे सहकारी बँका खाजगी बँकांशी सक्षमपणे स्पर्धा करू शकतील.देशातील सुमारे १,४०० शहरी सहकारी बँकांमध्ये तब्बल ६ लाख कोटी रुपयांच्या ठेवी असल्याचे नमूद करत त्यांनी या क्षेत्राची ताकद अधोरेखित केली. लहान बँकांमधील कर्जवसुलीचा दर जवळपास १०० टक्क्यांच्या आसपास आहे, हे या क्षेत्राचे मोठे यश आहे, असेही ते म्हणाले.


CHANGE IN NAME

My (old name) is **KARANPAL SINGH GURDEEP SINGH LONIWALE** which now I am, changing as (new name) **KARANPAL SINGH GURUDEEP SINGH LONIWALE**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Address

Sec no.2 abchalnagar colony nanded

maharashtra

Mob:8698685613


पान १ वरुन

## लोटस स्पा मसाज सेंटरवर...

पथकाने लोटस स्पा सेंटरवर छापा टाकला. स्पा सेंटरमध्ये वेश्या व्यवसाय सुरु असल्याचे आढळून आले. पोलीसांनी चार महिला व एका इसमास ताब्यात घेतले. सदरील महिला ह्या महाराष्ट्र व आसाममधील रहिवाशी आहेत. पोलीसांनी अटक केलेल्या लोटस स्पा सेंटरचा चालक गौरव सरपाते रा.राहुलनगर, हनुमानगड, नांदेड याने आपण सदरील व्यवसाय पवितसिंघ आरतीया याच्यासोबत भागीदारीत चालवित असल्याचे सांगितले. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४